# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि 268 /2020 दिनांक: 03 /05/2020

वाचा — 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा — 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897
4. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक 14 मार्च 2020
5. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/कावि-242/2020 दिनांक 24.03.2020
6. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/कावि 160 /2020 दिनांक 31.03.2020
7. गृह मंत्रालय भारत सरकार यांचे NO.40-3/2020-DM-I(A) दिनांक 3/4/2020.
8. महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक 1520/प्र.क्र.25/ना.पु.-23 दिनांक 2 एप्रिल 2020
9. जिल्हा शल्य चिकित्सक अकोला यांचे दिनांक 7.4.2020 चा दैनंदिन अहवाल.
10. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/कावि-191/2020 दिनांक 08.04.2020
11. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/कावि-242/2020 दिनांक 19.04.2020

**( डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला येथील वसतीगृह हेल्थ केअर सेटंर स्थापन करणे बाबत.)**

## *आदेश*

**ज्या अर्थी**, अकोला जिल्हयामध्ये कोरोना व्हायरसचा प्रसार रोखण्यासाठी पुर्वतयारी म्हणुन संशयीत रुग्णांना वेगळे ठेवण्याकरिता तसेच करोना व्हायरसचा प्रादुर्भाव वाढल्यास कोरेन टाईन व्हायरस संशयीत रुग्णांकरिता विलगीकरण केन्द्र निर्माण करण्याबाबत शासनाचे निर्देश आहेत. **आणि**

**ज्याअर्थी**, अकोला जिल्हयामध्ये कोरोना विषाणूचा संसंर्ग होवून बाधीत रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्या अनुषंगाने कोरोनटाईन रुग्णांकरिता डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील वसतीगृहामध्ये हेल्थ केअर सेंटर स्थापन करणे बाबत उपविभागीय अधिकारी, अकोला यांनी प्रस्तावित केले आहे. **आणि**

**ज्याअर्थी**, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे सदर प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत. **आणि**

**ज्याअर्थी**, कोरोना व्हायरस व प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी संधिग्ध रुग्णांना १४ दिवस निरिक्षणात ठेवण्याकरिता डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील वसतीगृह जिल्हा शल्य चिकित्सक तसेच आरोग्य विभाग यांच्या ताब्यात देणे आवश्यक आहे. व त्या जागेवर कोरोना व्हायरस कोरेन टाईनच्या वैद्यकिय पथक या व्यतिरिक्त कोणीही सदर क्षेत्रात प्रवेश करणार नाही या बाबत प्रतिबंध करणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाली आहे.

**त्या अर्थी**, मी, **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला , आपत्ती व्यवस्थापन कायदा- 2005 , साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 व महाराष्ट्र शासनाची दिनांक 14 मार्च 2020 चे अधिसूचना तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (१)** अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीनुसार खालील प्रमाणे नमूद केलेल्या डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील अस्तित्वात असलेल्या वसतीगृहाच्या इमारती कोरोना व्हायरस प्रभावित रुग्णांकरिता हेल्थ केअर सेंटर म्हणून तयार करण्याकरिता याद्वारे अधिग्रहित करण्यात येत असून सदर इमारती संबंधीत विभागाकडून जिल्हा शल्य चिकित्सक अकोला यांच्या ताब्यात देण्या बाबत याद्वारे आदेशीत करण्यात येत आहे. संबंधीत विभाग प्रमुख यांनी प्रस्तावित इमारती तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी यांचे समक्ष जिल्हा शल्य चिकित्सक, अकोला यांचे ताब्यात देण्याची कार्यवाही करावी.

..2..

NitinN 367

तपशिल

| अ.क्र. | वसतीगृहाचे नांव | खोल्याची संख्या |
|---|---|---|
| 1 | रायगड | 40 |
| 2 | सातपुडा | 25 |
| 3 | नरनाळा | 25 |
| 4 | सहयाद्री | 15 |
| 5 | फॉरेस्ट्री होस्टेल | 12 |
| | एकूण | 117 |

जिल्हा शल्य चिकित्सक, अकोला यांनी उपरोक्त नमूद इमारतीमध्ये कोरोना व्हायरस प्रतिबंध करण्यासाठी हेल्थ केअर सेंटरची निर्मीती करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. सदर परिसरामध्ये व इमारतीमध्ये ज्या व्यक्ती निरिक्षणाखाली ठेवण्यात येतील त्या वैद्यकिय कक्षात तसेच या संदर्भात काम करणारे शासकीय अधिकारी / कर्मचारी या व्यतीरिक्त कोणालाही प्रवेश राहणार नाही. या ठिकाणी आलेल्या व गेलेल्या व्यक्तींच्या आवश्यक नोंदी ठेवण्यात याव्यात. तसेच **सदर क्षेत्र हे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४** नुसार प्रतिबंधात्मक क्षेत्र म्हणुन घोषीत करण्यात येत आहे.

कुलसचिव, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,अकोला यांनी सदर वसतीगृहात निवास व्यवस्था, विद्युत पाणी व इतर आवश्यक सुविधा अखंडीत उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसेच प्रत्येक हॉस्टेलसाठी एक नोडल अधिकारी यांची नेमणूक करावी.

या ठिकाणी ज्या व्यक्ती निरिक्षणाखाली ठेवण्यात येतील त्यांची माहिती गोपनीय राहील या बाबत वैद्यकिय अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

सदर आदेश नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत पारीत करण्यात येत असल्यामुळे तात्काळ लागू करण्यात येत आहे.

या आदेशाद्वारे विहीत करण्यात आलेल्या कोणत्याही निर्बधांची किंवा, काढलेल्या आदेशाची अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्तीने, **भारतीय दंड संहिता, (1860 चा 45 ) याच्या कलम** 188 अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानन्यात येईल.

सदर आदेश आज **दिनांक 03 मे 2020** रोजी माझे स्वाक्षरी व शिक्क्यानिशी निर्गमित करीत आहे.

**(जितेंद्र पापळकर,** भा.प्र.से.)
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**

**प्रतिलिपी —**

1. मा. आयुक्त, *अमरावती* विभाग, अमरावती यांना माहिती करिता सादर.
2. जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला
3. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अकोला
4. आयुक्त, महानगरपालिका अकोला
5. कुलगुरु डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी उपरोक्त आदेशात नमुद केल्यानुसार आपले अधिनस्त शासकीय इमारती हया जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय अकोला यांना तातडीने आवश्यक पूर्तता करुन उपलब्ध करुन देण्यात यावे.
6. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
7. जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
8. उपविभागीय अधिकारी अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
9. तहसिलदार अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
10. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**